# विपश्यना

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष २५५७, माघ पौर्णिमा, १४ फेब्रुवारी, २०१४ वर्ष २ अंक १२

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**पाणिम्हि चे वणो नास्स, हरेय्य पाणिना विसं।**
**नाब्बणं विसमन्वेति, नत्थि पापं अकुब्बतो॥**

*धम्मपद - १२४, पापवग्गो.*

जर हाताला जखम नसेल तर हाताने विष हाताळू शकतो (कारण) जखमविरहित (शरीरात) विष चढत नाही. (असेच) (पापकर्म) न करणाऱ्याला पाप लागत नाही.

## कर्म सिद्धांत आणि त्याचे फळ

*( हे दीर्घ पत्र पूज्य गुरुदेवांनी ब्रह्मदेशातून येऊन भारतात वसलेल्या आपल्या छोट्या भावाला राधेश्यामजींना लिहिले होते. साधकांच्या लाभासाठी व प्रेरणेसाठी ते येथे प्रकाशित करीत आहोत, कोणाच्याही भावनेला ठेच पोहोचविण्याच्या इच्छेने नाही.-सं)*

रंगून १०-९-१९६६

प्रिय राधे, आशिष !

तुमचे २९-८-६६ चे पत्र मिळाले. ह्यापूर्वीच्या एका पत्रात कर्म सिद्धांतासंबंधी विचारलेल्या तुमच्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे आहे. प्रथम त्या प्रश्नाचे उत्तर देतो.

'मिलिंद प्रश्न' मध्ये राजा मिलिंदने भिक्षू नागसेनासमोर हा प्रश्न उपस्थित केला होता. मिलिंदच्या प्रश्नाला भिक्षू नागसेनांनी जे उत्तर दिले त्यानुसार हे सिद्ध झाले की जो न जाणता पाप करतो, त्याला अधिक पाप लागते. मिलिंदच्या प्रश्नाला व भिक्षू नागसेनांच्या संक्षिप्त उत्तराला बाजूला ठेवून आम्ही जाणता व न जाणता केलेल्या पापांच्या संबंधात जरा विस्ताराने समजण्याचा प्रयत्न करू. मी ह्या समस्येला तीन भागात वाटतो.

सर्व प्रथम आम्ही बुद्धकालीन त्या अरहंत भिक्षूची चर्चा करू जो आंधळा आहे आणि प्रातःकाली उठून आपल्या झोपडीसमोरील गवताच्या मैदानात फिरतांना आपली स्मृती कायम ठेवतो. त्याच्या या चालण्यामुळे लाल मखमली किडे दबून मरतात, ज्याची त्या भिक्षूला मुळीच माहिती नसते. आसपासचे लोक हे पाहून भगवानांजवळ तक्रार घेऊन जातात की अमुक भिक्षू फिरतांना जीवहिंसा करीत असतो. भगवान त्या तक्रार करणाऱ्यांना धिक्कारतात व त्या भिक्षूला निर्दोष सिद्ध करतात. एक तर ह्यामुळे की तो अंध आहे, त्यामुळे जाणत नाही की त्याच्या पायाखाली दबून कोणत्याही जीवाची हत्या झाली आहे. दुसरे तो अरहंत आहे, त्यामुळे त्याच्या मनात कोणत्याही प्राण्याची हिंसा करण्याची वृत्ती उत्पन्न होऊच शकत नाही.

आमच्यासाठी प्रथम भागच जास्त महत्वाचा आहे कारण अरहंत नसल्यामुळे तोच आमच्याशी जास्त संबंधित आहे. आम्हीही ह्याच प्रकारे न जाणता अनेक प्राण्यांची हिंसा चालतांना-फिरतांना, उठतांना-बसतांना, खातांना-पीतांना व श्वासोच्छ्वास करतांना करीत असतो. मी हे मानीत नाही की ही हिंसा आम्हाला कोणत्याही पापात भागीदार बनवते.

जोपर्यंत हिंसा करण्यासाठी आमच्या मनात हिंसक वृत्ती उत्पन्न होत नाही, म्हणजे अशी वृत्ती जी आम्हाला सक्रिय हिंसा करण्यासाठी प्रेरित करते आणि हिंसा केल्यावर संतुष्ट व प्रसन्नतेचा भाव प्रगट करते, अशा हिंसक वृत्तीच्या अभावात केली गेलेली हिंसा पापमयी हिंसा म्हटली जाऊ शकत नाही. परंतु काही लोक हिंसेला ओढून अतीपर्यंत घेऊन जातात आणि त्यापासून वाचण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम करतात. ते हे समजत नाहीत की असे उपक्रम सूक्ष्म हिंसेपासून वाचवू शकत नाहीत, उलट हिंसा वाढवूही शकतात. त्यामुळेच भगवान बुद्धांनी मध्यम मार्ग स्वीकारला. प्रत्येकाने शक्य तेवढे सतर्क राहावे आणि त्याच्या मनात हिंसक वृत्ती नसावी, एवढेच पर्याप्त आहे.

आता दुसऱ्या प्रकारच्या हिंसेचे एक उदाहरण घेऊ. वारंवार एक माशी अथवा डास आमच्या तोंडाजवळ येऊन गुणगुणतो. त्याच्या ह्या क्रियेमुळे आमचे डोके भणभणू लागते आणि क्रोधामुळे आम्ही दोन्ही हातांनी टाळी वाजवून त्या डासाला अथवा माशीला चिरडून टाकण्याचा प्रयत्न करतो. वारंवार प्रयत्न करूनही तो डास अथवा माशी आमच्या टाळीच्या पकडीत येत नाही आणि ह्यामुळे आमची चीड अजूनच वाढते. आम्ही अधिक सतर्कतेने प्रयत्न करून त्याला शेवटी चिरडूनच टाकतो. हे केल्यावर मनात एक प्रकारचा आत्मसंतोष व आल्हाद उत्पन्न होतो. ही हिंसा झाली. आता या हिंसेचे दोन भाग करू. एक व्यक्ती अशी हिंसा करतांना हे जाणत, मानत नाही की मी पापकर्म करीत आहे.तिला ह्या कार्याने आनंद होतो आणि तिचे मन वारंवार असे करण्यासाठी प्रेरित होते. एक अन्य व्यक्तीही हेच कर्म करते, परंतु ती जाणते की ती पापकर्म करीत आहे. त्यामुळे क्रोध आणि चीडेमुळे हिंसा तर करते परंतु थोडीशी संकोचते आणि हिंसा केल्यावरही थोडासा पश्चाताप करते. त्यामुळे जितके क्षण ती संकोचात आणि पश्चातापात काढते, तितके क्षण तर कुशल आहेत, अकुशल नाहीत. दुसरीकडे पाप न मानता विनासंकोच व पश्चातापाविना हिंसा करणारी व्यक्ती शंभर टक्के पापाची भागीदार आहे. त्यामुळे पहिल्यापेक्षा जास्त दोषी ठरते. भिक्षू नागसेनांनी ह्याचाच विचार करून मिलिंदला उत्तर दिले असेल आणि ह्यामुळेच मिलिंद संतुष्ट झाला असेल.

बुद्धांच्या साधनेत मनाला खूप महत्व दिले गेले आहे **''मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया''.** ह्यामुळेच कायिक व वाचिक कर्मांच्या तुलनेत मानसिक कर्मांचे महत्व अधिक मानले गेले आहे. प्रत्येक कायिक आणि वाचिक कर्म त्यावेळच्या मानसिक स्थितीने मोजले जाते आणि त्यानुसार पाप अथवा पुण्याची मात्रा कमी अथवा जास्त मानली जाते. वरील संदर्भानेच विभिन्न प्रकारच्या हिंसेच्या फळाला समजता येईल जसे -

१-एक डाकू धनाच्या लोभाने एका प्रवाशाच्या पोटात चाकू खुपसून त्याची हत्या करतो.

२-असेच कोणी डॉक्टर ऑपरेशन थियेटरमध्ये एका रोग्याच्या पोटाचे ऑपरेशन करतो आणि असे करतांना रोग्याच्या मृत्यूचे कारण बनतो.

ह्या दोघांच्या मानसिक स्थितीत किती मोठे अंतर आहे. प्रकृती दोघांच्या मनोस्थितीनुसारच त्यांच्या कर्माचे फळ देईल. ह्यात कुठलाही संशय अथवा दुमत होऊ शकत नाही.

विश्वास आहे की कर्म आणि कर्मफळाची व्याख्या समजली असेल. ह्याबाबतीत जर काही संशय असला तर पुन्हा पत्र लिहून विचारावे.

## श्रावणी

काही दिवसांपूर्वी श्रावणीचा सण आला आणि परिवारासमोर हा प्रश्न उभा राहिला की उच्च कोटीची साधना करणाऱ्यांनी हा सण कसा साजरा करावा आणि जर ह्यापासून दूर राहावयाचे असेल तर कसे राहावे ? पिढ्यांपासूनचा संस्कार आहे आणि जीवनभरची सवय आहे जी कोणत्याही परंपरेला तोडतांना आमच्या मनात भिती निर्माण करते. मनात वाटते की ह्या बेड्यात अडकूनच राहावे. थोडासा तरी मनात हा वितर्क येतोच की हा तर धार्मिक सण नाही त्यामुळे ह्याला साजरा न करण्याची अथवा ह्यात परिवर्तन करण्याची काय आवश्यकता आहे ?

आमच्या सणांचा धार्मिक आणि सामाजिक फरक इतका क्षीण आहे की ह्याला स्पष्टपणे जाणताही येत नाही. सामाजिकता व धार्मिकता एक दुसऱ्यात मिसळली जाते. हीच बाब ह्या श्रावणीच्या सणालाही लागू होते. आपल्या घरात ह्या सणाला साजरा करण्याच्या पद्धतीला तीन भागात विभक्त करता येते -

१. नवीन यज्ञोपवीत धारण करणे.

२. गृहद्वारावर देवी-देवता इत्यादीचे शकुन लिहून त्याला नैवद्य चढवणे.

३. ब्राह्मणांद्वारे व घरातील बहीण-मुलींद्वारे आपल्या मनगटावर राखी बांधविणे व त्यांना दक्षिणा देणे.

## १. यज्ञोपवीत -

यज्ञोपवीत धारण करण्याची प्रथा न जाणे कधी व का सुरू झाली? होय, इतके निश्चित आहे की वैदिक काळापासूच ह्याचे प्रचलन आहे. वैदिक काळात कर्मकांडामुळे जितके मोठे महत्व ह्या यज्ञोपवीताला दिले गेले, आज यज्ञ न करताही अधिकांश हिंदू परंपरांमुळे त्याला तितकेच महत्व देतात. त्यामुळेच यज्ञ करण्याचे अधिकारी उच्च तीन वर्णच ह्याला धारण करतात. चौथा वर्ण ह्याचा अधिकारी मानला जात नाही. स्पष्ट आहे की हे तिन्ही उच्च वर्ण जन्मामुळे मानले जाणारे वर्ण आहेत, कर्मामुळे नाहीत. कोणी ह्यामुळे ब्राह्मण, क्षत्रिय वा वैश्य आहे की तो संयोगामुळे त्या-त्या घराण्यात जन्मला आहे आणि केवळ ह्यामुळेच तो यज्ञोपवीत धारण करण्याचा अधिकारीही आहे.

बुद्धकालीन मान्यता ह्या अविवेकपूर्ण समाज विभाजनाला स्वीकारण्यासाठी तयार नाही आणि म्हणूनच ह्या विभाजनाच्या प्रतीकरूपात ह्या यज्ञोपवीतालाही स्वीकारण्यास तयार नाही. त्यामुळे ह्याचे धारण करणे कोणत्याही बुद्धानुयायीसाठी सर्वस्वी असंगत आहे. आमच्या इथे ब्राह्मण त्याला मानतात ज्याने समथ अथवा विपश्यनेद्वारे आपल्या चित्ताला आसक्ती व द्वेषापासून सर्वस्वी विमुक्त करून त्याला ब्रह्माच्या चित्तासमान विशुद्ध बनविले असेल, मग भलेही तो एखाद्या शुद्राणी मातेद्वारे जन्मला असेल अथवा ब्राह्मणी मातेपासून.

## २- गृहद्वारावर शकुन

प्रथा आहे की घराच्या मुख्य द्वारावर देवी-देवतांची नावे लिहिली जातात आणि सायंकाळपूर्वी ह्यांना मिष्टान्न अर्पित केले जाते. मला वाटते की पूर्वी देशातील घराघरात ध्यान करण्याची पद्धत होती आणि देशातील विभिन्न लोक विभिन्न पद्धतीचा अवलंब करीत होते. असे लोक जे उच्च कोटीची ब्रह्ममयी साधना अथवा लोकोत्तर विपश्यना साधना करू शकत नव्हते, ते देव साधनेत संतुष्ट राहात होते. देव अथवा प्रेत साधना जवळपास सर्व देशात होते. ब्रह्मदेशातही घरोघरी नाटची पूजा होते, जरी ब्रह्मदेशी लोक स्वतःला शुद्ध स्थविरवादी बौद्ध म्हणवितात. हे केवळ ह्यामुळे होते की उच्च कोटीची ब्रह्ममयी साधना अथवा लोकोत्तर विपश्यना साधना खूप सोपी नाही आणि ह्या साधनांना शिकविणारे सद्गुरू सहज उपलब्ध नाहीत.

अशा अवस्थेत साधारण जनतेने देवी-देवतांची उपासना करणे स्वाभाविक आहे. ह्यांना आम्ही भूदेव म्हणतो. परंतु मनुष्य कधीही हे मानण्यास तयार नाही की तो ज्या देवांची पूजा करीत आहे, तो परमेश्वराच्या श्रेणीचा नाही. उपासकासाठी तर त्याचा उपास्य देव परमोच्च परमेश्वरच आहे.असे असल्याशिवाय त्याची श्रद्धा पक्की राहू शकत नाही. परंतु कधी- कधी असेही होते की उपासक आपल्या उपास्य देवाला कोणी महान देव वा ईश्वराचा अवतार अथवा सेवक मानून त्याची पूजा करतो. सेवक जसे हनुमानाला रामाचा, गणेश, कार्तिकेय, भैरव, काली इत्यादींना शिवाचा आणि श्यामजी इत्यादींना कृष्णाचा सेवक म्हटले गेले. तसेच जसे ब्रह्मदेशात नाटगण, बुद्धाचे सेवक मानून पूजले जातात.

ह्या प्रकारची उपासना करणारे लोक आपले व आपल्या घरांचे संरक्षण अशा सेवकांना सोपवू इच्छितात. त्यामुळे घरांच्या द्वारावर देवी-देवतांचे नाव लिहून ज्या शकुनांची स्थापना केली जाते, ती मुख्यतः अशा सेवकांना द्वारपालाच्या रूपाने स्थापित करण्याच्या परंपरेमुळेच आहे. ही वेगळी बाब आहे की असे करण्यामुळे खरोखर कोणी सेवक देव द्वारपाल बनतो अथवा नाही.

ह्याच दृष्टीने उच्च कोटीच्या ब्राह्मी अथवा विपश्यना साधनेच्या मार्गावर दृष्टिक्षेप टाकू. बुद्धांनी सर्व लोकांची रचना करणाऱ्या निर्माता ईश्वराच्या अस्तित्वाला स्वीकारले नाही, परंतु असंख्य कोटी देवी-देवता आणि ब्रह्मांच्या अस्तित्वाला स्वीकारलेच नाही तर सिद्धही केले. भगवान केवळ मनुष्यांचेच शास्ता म्हणजे गुरू नव्हते तर देव-ब्रह्मांचेही शास्ता होते.

ते सारे देव व ब्रह्मा जे भगवान बुद्धांपासून ध्यान शिकून उच्च अवस्था प्राप्त आहेत, ते जेथे कोठे कोणी बुद्धांचे उपासक उच्च कोटीचे ध्यान करतात, तिथे आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठी त्यांच्या संरक्षण आणि सहयोगासाठी उपस्थित होतात.

## ३- रक्षाबंधन

ह्या प्रथेच्या सुरवातीसंबंधी फारसा शोध करण्यात आला नाही. परंतु माझी मान्यता आहे की ही भारताच्या तांत्रिक युगाची निर्मिती आहे. ह्या युगात लोक तंत्र साधनेद्वारे छोट्या-मोठ्या प्रेतांना व खालच्या वर्गाच्या देवांना आपल्या काबूत करीत असतील आणि एखाद्याच्या मनगटावर सूत्र बांधतांना रक्षा मंत्राचे उच्चार करून त्या देवांवर संरक्षणाचा भार सोपविला जात असेल. हे कार्य बहुधा समाजाचा पुरोहित वर्ग करीत असेल आणि कदाचित महिलाही ह्यात निपुण असतील. बहिणींचा आपल्या भावांप्रती नैसर्गिक स्नेह असल्यामुळे त्यांच्या सुरक्षेसाठी ह्या देवांना संरक्षक बनवून रक्षाबंधनाचा उपक्रम केला जात असेल. ह्याच प्रकारे ब्राह्मणांद्वारे आपल्या यजमानांचाही. हळूहळू ती तांत्रिक परंपरा समाप्त झाली आणि ब्राह्मणांची व स्त्रियांची मंत्र शक्तीही. आता उरला त्या जुन्या परंपरेच्या प्रतीकरूप हा रक्षाबंधनाचा धागा ज्याचा खरोखर काहीही मंत्र-सिद्ध उपयोग राहिला नाही. कोणाच्या बांधलेल्या रक्षाबंधनाच्या सूत्रात खरोखर संरक्षणाची शक्ती असेल, असे कोठे पाहण्यात-ऐकण्यात येत नाही. त्यामुळे ह्याला केवळ अंधानुकरण करणेच म्हटले जाईल.

आता आम्ही कोणाच्याही रक्षेला बुद्धांच्या साधनेच्या दृष्टीने पाहू. हे सत्य आहे की बुद्धकालीन मान्यतेतही पुष्कळशा देव-ब्रह्मांना आव्हान केले जाते जे संबंधित व्यक्तीच्या रक्षेचा भार उचलतात. परंतु भगवानांच्या उपदेशांचे जर लक्षपूर्वक चिंतन केले तर स्पष्ट जाहीर होते की मनुष्याचे संरक्षण त्याचे आपले केलेले पुण्यकर्मच करते. जर कोणी दुःचरीत आहे तर दुःख त्याच्यामागे तसेच लागते जसे बैलगाडीला जोडलेल्या बैलाच्या मागे त्या गाडीचे चाक.

त्यामुळे जर कोणाला आपली सुरक्षा करायाची आहे तर त्याने कायिक, वाचिक व मानसिक चांगल्या कर्मांचे संपादन करावे. त्याव्यतिरिक्त जर त्याने कायिक, वाचिक व मानसिक वाईट कर्म केली असतील तर त्यांना भगवानांच्या आदेशानुसार विपश्यना साधनेद्वारे तप करून, तप्त करून, सुकवून, कर्मबिजांना भाजून घ्यावे, ज्यामुळे ती अंकुरित होऊन फलित- फूलित होऊ नयेत. असे केल्यामुळे मनुष्य आपली सुरक्षा स्वतः करतो. कालांतराने एक श्लोक प्रचलित झाला, ज्याचा एक चरण आहे **''धर्मो रक्षति रक्षितः'',** हा पदांश बुद्धांच्या शिकवणुकीच्या शत-प्रतिशत अनुकूल आहे. रक्षण केलेला धर्मच आमची रक्षा करतो. जर आम्ही धर्माचे संरक्षण केले म्हणजे शील, समाधी व प्रज्ञाचे संपादन केले आहे तर आमच्या शुभ कर्मांद्वारे उत्पन्न हे उत्तम धर्म, ह्या उत्तम चित्तवृत्ती स्वतःच आमचे संरक्षण करतील. स्वतःद्वारे संपादित उत्तम चित्तवृत्तीच बहुधा साकार होतात. बहुधा हे होते की आमच्या आव्हान केल्याविनाही ते सर्व सम्यक देव-ब्रह्मा जे आमच्या पूर्व जन्मात संचित पुण्य-पारमितात सहयोगी आणि सोबती राहिलेले आहेत, ते वेळी-अवेळी आमची सुरक्षा करीत राहतात, परंतु अट ही असते की आम्ही शील, समाधी व प्रज्ञासंपन्न असावे.

ह्या सत्याला समजल्यावरही जर कोणी व्यक्ती समजते की कोणाद्वारे रक्षासूत्र बांधल्यामुळेच त्याची सुरक्षा होईल तर याला भ्रांती आणि मिथ्यादृष्टीच म्हटले जाईल. जर बहिणीला आपल्या भावाशी स्नेह आहे आणि जर ती आपल्या भावाच्या सुरक्षेबाबत आतुर आहे तर तिने प्रथम आपल्या सुरक्षेसाठी शील, समाधी व प्रज्ञेचे स्वतः संपादन करावे व आपल्या भावालाही असेच करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ह्या प्रकारे रक्षाबंधन बांधून जर ती भावापासून आपल्या सुरक्षेची अपेक्षा ठेवते तरीही तिच्यासाठी एकच मार्ग आहे की एकतर तिने स्वतः शील, समाधी व प्रज्ञेचे संपादन करावे आणि दुसरीकडे आपल्या भावालाही ह्यासाठी प्रेरित करावे.

ही बाब सर्वांच्या मनात बिंबली पाहिजे की आपल्याद्वारे रक्षित धर्मच आमची रक्षा करेल. जर आम्ही धर्माची हानी करू तर धर्म आमचा नाश करेल.म्हणजे जर आम्ही दुःशील, दुःसमाधिस्त व दुःप्रज्ञ झालो तर आमचा सर्वनाश निश्चित आहे. आम्हाला न कोणी देवी-देवता वाचवू शकतो न कोणाद्वारे बांधलेले मंत्रसिद्ध अथवा मंत्रअसिद्ध रक्षांचे धागे. हाच मूलमंत्र असला पाहिजे की **''धर्म एव हतो हन्ति, धर्मो रक्षति रक्षितः''** हनन केलेला धर्म आमची हत्या करतो आणि रक्षा केलेला धर्म आमची रक्षा करतो. हीच सम्यक दृष्टी आहे, बाकी सर्व मिथ्यादृष्टी. त्यामुळे अशा सणांच्या प्रसंगी शील पालन, दान व जास्तीतजास्त विपश्यना साधना करण्यातच आमचे मंगल सामावले आहे.

मिथ्यादृष्टीची बाब निघाली तर एक बाब अजून ध्यानात आली जिला लिहिणे योग्य समजतो. आमच्या घरात कोणत्याही सणा-वारांच्या दिवशी महिलांनी हाता-पायांना मेंदी लावण्याची प्रथा आहे. मला यात कोणत्याही मंत्रसिद्ध देवी-देवतांशी संबंधित परंपरेचा समावेश दिसत नाही. जर कधी राहिला असेल तर कदाचित असेलही. परंतु मला तर असे वाटते की हे पूर्णपणे शृंगाराचे एक साधन आहे. प्रत्येक स्त्री आपल्या पतीला आकर्षून ठेवण्यासाठी आपल्या साज-शृंगाराप्रती सचेत राहते आणि अन्य शृंगाराच्या साधनांप्रमाने मेंदीही असेच एक प्रसाधन आहे. विधवा स्त्रिला शृंगार-सजावटीची मनाई असल्यामुळे मेंदी लावणे तिला वर्ज्य आहे. कालांतराने झाले असे की मेंदी लावणे व न लावणे, यामध्ये एक स्पष्ट विभाजन झाले- ज्या स्त्रिया सौभाग्यवती आहेत त्यांनी मेंदी लावावी आणि ज्या विधवा आहेत त्यांनी लावू नये. ह्या विभाजनाने मूळ दृष्टिकोनाला खूप बदलून टाकले आणि हळूहळू मेंदी सौभाग्याचे एक चिन्ह झाले. सणा-वाराच्या दिवशी मेंदी लावली नाही तर तो अपशकुन मानला जाऊ लागला आणि अनिष्टांच्या भितीने कोणतीही सौभाग्यवती स्त्री अशा प्रसंगी मेंदी लावल्याविना राहू शकत नाही.

हीच बाब कपाळावरील टिकली, भांगेतील कुंकू आणि हातातील बांगड्यांनाही लागू आहे. हि सर्व शृंगाराची साधने आहेत आणि आता सौभाग्याची खूपच नाजूक चिन्ह बनली आहेत, ज्यापैकी एकाचेही नसणे हे गृहिणीला आपल्या पतीच्या प्रती अनिष्टांच्या आशंकेने कंपित करते. मिथ्यादृष्टीने ह्या प्रकारे सखोल आपली मूळे पसरली आहेत. गृहिणी विचार करते की जर आज मी भांगेत कुंकू भरले नाही, कपाळावर टिकली लावली नाही, हातात बांगडया घातल्या नाहीत अथवा एखाद्या सणा-वाराच्या दिवशी मेंदी लावली नाही तर जणू मोठा अपशकुन झाला आणि तिच्या प्रिय पतीचे जीवन धोक्यात आले.

सम्यकदृष्टीवाल्या बुद्धांच्या साधकांना अशा मिथ्यादृष्टीपासून वाचले पाहिजे. येथेही तीच बाब लागू आहे. पतीचे दीर्घ जीवन त्याच्या पूर्वीच्या व आताच्या कर्मावर निर्भर आहे. पत्नीचे सौभाग्यवती बनून सुखी राहणे अथवा विधवा होऊन दुःखी होणे तिच्या आपल्या चांगल्या व वाईट कर्मांवर निर्भर आहे. जर गृहिणीला वाटते की तिचा पती दीर्घकाळापर्यंत निरोगी राहून जीवंत राहो तर तिने आपल्या पतीला शील, समाधी व प्रज्ञेच्या आर्य अष्टांगिक मार्गावर चालण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. जर तिला स्वतःला सुखी राहायचे आहे तर तिला स्वतःलाही शील, समाधी व प्रज्ञेच्या ह्या आर्य अष्टांगिक मार्गावर दृढतापूर्वक चालले पाहिजे. तिच्या पतीला व तिच्या भावी सुखाला न हाताची मेंदी वाचवू शकते, न भांगेतील कुंकू वाचवू शकते, न कपाळावरील टिकली वाचवू शकते आणि न हातातील बांगड्या वाचवू शकतात.

एकच बाब आहे **''धर्मो रक्षति रक्षितः''** आणि हीच सम्यकदृष्टी आहे. सर्व प्रकारच्या मिथ्यादृष्टींपासून, रूढींपासून, अंधविश्वासांपासून, शील-व्रत परामर्शाच्या परंपरांपासून वाचणेच खरा बुद्धांचा मार्ग आहे. कोणत्याही सण-वाराला, धार्मिक व सामाजिक उत्सवाला साजरे करतांना आम्हाला भगवानांच्या ह्या अमूल्य वाणीचे मार्ग-निर्देशकाप्रमाणे स्मरण ठेवले पाहिजे -

**सारञ्च सारतो ञत्वा, असारञ्च असारतो।**
**ते सारं अधिगच्छन्ति, सम्मासङ्कप्पगोचरा॥**

*- धम्मपद १२, यमकवग्गो*

जे सारास सार जाणतात आणि असारास असार, अशा खऱ्या संकल्पात लागलेले लोकच साराला प्राप्त करतात. असाराच्या मागे लागलेले लोक तर मिथ्यादृष्टीच्या मृगजळामागेच फिरत राहातात.

- साशिष, स.ना.गोयन्का --

*(पत्राला प्रकाशनयोग्य बनविण्यासाठी काही बदल केले गेले आहेत.-सं)*

## विश्व विपश्यना पॅगोड्याच्या भूमीत श्रीलंकेच्या 'जयश्री महाबोधी' वृक्ष रोपणाचा ऐतिहासिक प्रसंग

अडीच हजार वर्षांच्याही पूर्वी सिद्धार्थ गौतम भारतातील एका पिंपळाच्या वृक्षाखाली बोधी प्राप्त करून सम्यक संबुद्ध बनले. इतिहासात तो वृक्ष पूज्य झाला आणि त्याला सन्मानपूर्वक **'महाबोधी वृक्ष'** म्हटले जाऊ लागले. बोधीचा अर्थ आहे ज्ञान. ह्याखालीच सम्यक संबुद्धांनी चार आर्यसत्यांना जाणले होते.

ह्याच्या अडीचशे वर्षांनंतर सम्राट अशोकाच्या काळात श्रीलंकेचा राजा देवानां पियतिस्सला तेथे बोधीवृक्ष लावण्याची आवश्यकता वाटली. त्याच्या निष्कपट विनंतीमुळे सम्राट अशोकाने ह्याच पवित्र 'महाबोधी' वृक्षाचे एक रोप भारतातून श्रीलंकेला पाठविले होते, जे पुराणतम वृक्ष रूपाने आजपर्यंत फळ-फूल देत आहे आणि बुद्धांच्या वैज्ञानिक शिकवणुकीच्या मार्गावर लोकांना चालण्यासाठी व दुःखातून मुक्त होण्यासाठी प्रेरित करीत आहे. हा वृक्ष अनुराधपूर येथे आहे आणि ह्याला **'जयश्री महाबोधी'** म्हणतात.

विपश्यनेचे मुख्य आचार्य पूज्य श्री सत्यनारायण गोयन्काजींची ही इच्छा होती व विश्व विपश्यना न्यासच्या धर्म परिवाराचीही ही महत्वपूर्ण इच्छा आहे की येथे येणारे लोक प्रभावी पद्धतीने धर्म मार्गावर चालण्यासाठी प्रेरित होवोत. त्यासाठी श्रीलंकेतून **'जयश्री महाबोधी'** ची एक शाखा येथे आणण्यासाठी संपर्क साधण्यात आला. ह्या वृक्षाचे भारत व विश्वासाठी खूप मोठे ऐतिहासिक महत्व आहे. त्यामुळे आदरणीय भदन्त अटमस्थानाधिपती नायक डॉ. पल्लेगम सिरिनिवास नायक थेर व काही अन्य भिक्षू तसेच उपासकांसोबत, ह्या शताब्दीत प्रथम वेळी त्या वृक्षाची शाखा येथे परत आणण्यात येत आहे, ज्याखाली बुद्धांनी ज्ञान प्राप्त केले होते. ह्याचा **रोपण समारंभ २ मार्च, २०१४** ला विश्व विपश्यना पॅगोड्याच्या परिसरात **सकाळी ९ ते १०-४५** दरम्यान होईल. सर्व साधक ह्या समारोहात भाग घेण्यासाठी सादर आमंत्रित आहेत.

ह्या प्रसंगी होणाऱ्या **संघदानात** सामील होण्यासाठी इच्छुकांनी संपर्क करावा- श्रीमती मधुबेन पी. सावला, इगतपुरी वा श्रीमती अमीता पारेख, मुंबई. फोन ०२२-२६१२२२२६, Eamil: amita.a.parekh@gmail.com

**२०१४ मध्ये खालील प्रसंगी पूज्य माताजींच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर**

**बुद्धपौर्णिमा, रविवार, १८ मे, आषाढी पौर्णिमा, रविवार, १३ जुलै व पूज्य गुरूदेवांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, २८ सप्टेंबरला, वेळ-** सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पॅगोड्यात'**. येथे **३ वाजता दिवंगत गुरुदेवांच्या रेकॉर्डेड प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात.** कृपया खालील फोन नंबरवर अथवा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. **कृपया बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्क-** फोन नं.: 022-28451170 / 022-33747501- Extn. 9, 022-33747543 / 33747544, (**फोन बुकिंग-** सकाळी ११ ते सायं ५ पर्यंत,रोज) ईमेलः **Regn: oneday@globalpagoda.org**
**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

**Additional Responsibilities:**

**Teachers**

1-2. Mr. Martin & Mrs. Deni Stephens; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Portugal
3-4. Mr. Steve & Mrs. Olwen Smith; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Ireland
5. Mr. Kenneth Truedsson; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Norway, Denmark & Finland
6-7. Mr. Heinz Bartsch & Mrs. Brunhilde Becker; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Austria
8-9. Mr. Klaus & Mrs. Edith Nothnagel; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Poland
10. Ms. Andrea Schmitz; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Ukraine, Kirgistan, Latvia

**Senior Assistant Teachers**

1-2. Mr. Arthur Rosenfeld & Mrs. Ana Teixido; To assist Mr. Dirk Taveirne & Mrs. Mieke De Wilde in serving Non-Centre courses in the Netherlands
3-4. Dr. Teun Zuiderent & Dr.(Mrs.) Sonja Jerak; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Slovenia, Croatia, Serbia
5.Ms. Andrea Gerber; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Turkey
6-7. Mr. Kostas Lempidakis & Mrs. Claudia Hackfort; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Greece;
8-9. Mr. David & Mrs. Line Lander; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Hungary, Estonia
10-11. Mr. Thomas & Mrs. Heike Willburger; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Bulgaria
12. Mr. Sigitas Baltramaitis; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Lithuania

**Assistant Teachers**

1. Mr. Michael Vatter; To assist the Co-ordinator Area Teacher in serving Non-Centre courses in Czech Republic

**नव नियुक्ती**

**सहायक आचार्य**

१. श्रीमती मंगला दहिवेले, औरंगाबाद
२. श्री पंजाबराव रायबोले, औरंगाबाद
३. श्री प्रीतिकमल पाटिल, चंद्रपुर
४. श्री प्रेमलाल साखरे, दुर्ग
५. श्री रविकुमार मेदी, नांदेड
६. श्री केशवलाल पटेल, नवसारी

(**बालशिबिर शिक्षक पुढील अंकात**)

## दोहे धर्माचे

धर्म जगाचा ईश्वर, धर्म ब्रह्म भगवान।
धर्म सदा रक्षा करे, धर्म महा बलवान।।

पुत्र न रक्षा करू शकतो, पिता न माता भ्रात।
कोणी वाचवू न शके, काळ करे जर घात।।

आपली रक्षा स्वतः कर, सोडून इतर आस।
जर तू स्वयं रक्षा करे, देव ब्रह्म आसपास।।

प्रज्ञा नित जागृत राहो, शील गंगच्या तीर।
धर्म सदा करत राहो, रक्षा तुमची वीर।।

## दोहे धर्माचे

ठेव धर्माचा आसरा, ठेव धर्माची टेक।
सुखात दुखात सर्वदा, जागे धर्म विवेक।।

स्व चित्त सुधारल्याविना, कोणी ना ये काम।
स्वयं चित्तावर बावळट, कठोर राख लगाम।।

इंद्र स्वतः हजर होयी, देव चाकरी करी।
जर तू स्वयं चित्ताचा, स्वतःच मालक ठरी।।

कोण देवी व देवता, ईश ब्रह्म भगवान।
कामा येती फळ पिकता, भोग स्वतः नादान।।

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फॅक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org